महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९
फोन : २४०७७४४१ फॅक्स : २४०२५७६३

मासं/रवका/न.क्र.२८७/ 15569 दिनांक : ०१/०६/२०१२

4 JUN 2012

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या.
परिमंडळ कार्यालय, नाशिक.
आवक क्रमांक 1490 दि.
आस्थापना
लेखा विभाग
तांत्रिक विभाग-१ 15 JUN 2012
तांत्रिक विभाग-२

प्रति,
मुख्य अभियंता,
परिमंडल कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.मर्यादीत,
अकोला/औरंगाबाद/भांडूप शहर/बारामती/जळगाव/कल्याण/कोल्हापूर/लातूर/
नागपूर/नाशिक/नांदेड/पुणे/रत्नागिरी/नागपूर शहर.

**विषय : कारागीर-अ/तारमार्ग कार्यदेशक/मीटर निरीक्षक श्रेणी-१/मीटर चाचणीकार श्रेणी-१ व कारागीर-अ(विद्युत चाचणी) या संवर्गास प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अंतर्गत तरतुदीनुसार तृतीय लाभासाठी उच्चस्तर वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत.**

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१०
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३२० दि.२२.११.२०१०

--------

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की प्रशासकीय परिपत्रक क्र.३२० दि.२२.११.२०१० द्वारे वरील संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अंतर्गत तरतुदीनुसार तृतीय लाभासाठी उच्चस्तर वेतनश्रेणी विहित करण्यात आली होती. परंतु सदर विहित केलेली वेतनश्रेणी यापुर्वीच वरील संवर्गात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास द्वितीय लाभ म्हणून मंजुर करण्यात आलेली आहे अशा आशयाचे संदर्भ विविध क्षेत्रिय कार्यालयातून प्राप्त झाले आहेत.

२. यावर मुख्य कार्यालय स्तरावर विचार विनिमय करुन सक्षम अधिकाऱ्यांनी कारागीर-अ/तारमार्ग कार्यदेशक/मीटर निरीक्षक श्रेणी-१/मीटर चाचणीकार श्रेणी-१ व कारागीर-अ(विद्युत चाचणी) या संवर्गास प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अंतर्गत तरतुदीनुसार तृतीय लाभासाठी उच्चस्तर वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत खालीलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

१) कारागीर-अ/तारमार्ग कार्यदेशक/मीटर निरीक्षक श्रेणी-१/मीटर चाचणीकार श्रेणी-१ या पदास दुरूस्ती चिठ्ठी क्र.१९ दि.१७.०३.१९९३ अन्वये द्वितीय लाभ कनिष्ठ अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीचा (रु.१५२८५-६७०-१८६३५-७०५-३६९३५) यापुर्वीच मंजूर करण्यात आलेला असल्याने सहा. अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीचा (रु.१९२०५-७८०-२३१०५-८४५-४३३८५) तृतीय लाभ फक्त दु.चिठ्ठी क्र.१९, दिनांक १७.०३.१९९३ अन्वये कनिष्ठ अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीचा द्वितीय लाभ मंजूर करण्यात आलेला आहे अशा कर्मचाऱ्यांनाच फक्त मंजूर करावा.

२) कारागीर-अ (विद्युत/चाचणी) या पदास प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४४० दिनांक १८.१०.२००४ अन्वये द्वितीय लाभासाठी सहा.अभियंता या पदाची वेतनश्रेणी रु.१९२०५-७८०-२३१०५-८४५-४३३८५ यापुर्वीच मंजूर करण्यात आलेली असल्याने तृतीय लाभासाठी उप कार्यकारी अभियंता या पदाची वेतनश्रेणी रु.२१३६५-८४५-२५५९०-९००-४८०९० फक्त प्रशासकीय परिपत्रक क्र.४४० दिनांक १८.१०.२००४ अन्वये द्वितीय लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांसाठीच मंजूर करण्यात यावी.

श्री जाधव
P/w send copy to Rural circle NSK
7/5/6/12

३. तरी याबाबतीत आपणास कळविण्यात येते की वरीलप्रमाणे आपल्या परिमंडळात प्रलंबित असणारी वरील संवर्गाबाबतीत प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० मधील तरतुदीनुसार उच्चस्तर वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत प्रलंबित असणारी तृतीय लाभाची प्रकरणे आपल्या कार्यालयीन स्तरावर सत्वर निकाली काढण्यात यावीत.

४. वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदार संबंधित परिमंडलातील व्यवस्थापक (मा.सं.) यांची आहे.

(संदेश ए. हांके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.)**

प्रत सादर :

कार्यकारी संचालक (मा.सं.), म.रा.वि.वि.कं. मर्या. प्रकाशगड, बांद्रा (पुर्व), मुंबई.

प्रत सस्नेह रवाना :

१) मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं./ता.आस्था.), म.रा.वि.वि.कं. मर्या. प्रकाशगड, बांद्रा (पुर्व), मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक,(संधिक -लेखा), म.रा.वि.वि.कं. मर्या. प्रकाशगड, बांद्रा (पुर्व), मुंबई.

No - 2358 16 JUN 2012

CE/NSKZ/HR/ DT.
Copy forwarded to:-
The Supldg Engr
Rural Circle
Nashik

O & M CIRCLE
M. S. Elect. Distribution Co. Ltd. Nashik
Inward No. 7736
18 JUN 2012
Asstt.Mang.(HR) (R)
DY CAO
EE A.E.-II A.E.-III

P. P. BAGUL
MANAGER (HR)
MSEDCL (NSKZ)

D:\O&M\Ltr-F.N.283 G.O.74.doc
01/06/2012